नि.दि.दा.क्रमांक. १३/२०२२

<u>निशाणी क्र.५४ वर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे प्रतिवादीं विरुध्द झालेला विना म्हणणे व कैफियतचा आदेश रद्द करणेबाबत दाखल केला आहे. अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.५५ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. वादीतर्फे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला असून अर्जातील मजकूर चुकीचा आहे, प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कुटूंबातील आहे, अर्जात नमूद विलंबाचे कारण योग्य व संयुक्तीक नाही, अर्जातील कागदपत्रांचा उल्लेख केला नाही, त्यामूळे अर्ज नामंजूर करावा व रक्कम रुपये १०,०००/- खर्च लावावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे वकील श्री भादूले यांनी प्रस्तू अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतली आहे.

४. प्रस्तूतचा दावा मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. अभिलेखाची पाहणी केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे १३.०१.२०२२ रोजी दाव्यात हजर झाले परंतू त्यांनी कैफियत व म्हणणे न दिल्याने त्यांच्या विरुध्द दिनांक १०.०८.२०२२ रोजी निशाणी १ वर आदेश पारीत करुन विना कैफियत व म्हणणे पारीत करण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी या अर्जाद्वारे सदरचा आदेश रद्द करण्याची विनंती केली. प्रतिवादी अर्जात नमूद केलेले कारण हे समधानकारक असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी ऑगस्ट २०२२ पासून कोणत्या कारणामूळे कैफियत देता आली नाही हे स्पष्ट केले नाही. त्यामूळे अर्जातील करण हे मोघम असल्याचे दिसून येत आहे. मात्र दाव्याच्या निकालासाठी पक्षकारांचे हक्क निश्चित केले जाणार असल्याने तसेच प्रस्तूतचा दावा या घडीला निशाणी ५ च्या चौकशीसाठी प्रलंबीत असल्याने व त्यासाठी प्रतिवादींना बचावाची संधी देणे नैसर्गीक न्यायतत्वास अपेक्षीत आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीस त्यांचा बचाव न्यायालयात दाखल करण्याची संधी देणे

दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी आवशक व महत्वाचे आहे. तसे न केल्यास प्रतिवादीस संधी नाकारल्यासारखे होवून त्यांचे नुकसान होणार आहे. याउलट, वादीला कोणतेही नुकसान नाही. याउलट प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यासाठी केलेल्या विलंबाबात त्यांच्याकडून खर्चा दाखल रक्कम वादीला देण्यास सांगीतल्यास योग्य होईल. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन मी खालील प्रमाणे आदेश परीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये १०००/- च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी खर्चाची रक्कम वादीस दिल्यानंतर किंवा न्यायालयात जमा केल्यानंतर त्याची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

३. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी पुढील तारखेपर्यंत रक्कम जमा न केल्यास प्रस्तूतचा अर्ज रद्द समजण्यात यावा.

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2023.07.07 17:48:00 +0530

[ एम.आर.कामत]

दिनांक - ०७.०७.२०२३.

सह. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पंढरपूर.

Certificate

(a) Name of the Stenographer : Rajiv M. Gogi

(b) Court. : Jt. C.J.J.D., Pandharpur

(c) order dictated on : 07.07.2023